Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-VII July 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - III Issue-VII JULY 2016 ISSN 2349-638x Impact Factor 2.147

स्वयं अध्ययन-अध्यापन शैक्षणिक साहित्य विकसनासाठी नियोजन :एक अभ्यास

प्रा.डॉ.शिंदे सुशील शेषेराव.
जयक्रांती अध्यापक महाविद्यालय,
लातुर.
मो.९१७५६४११९१

प्रस्तावना:—

'स्वयं—अध्यापन साहित्य' हा शब्द Self Instructional Material या इंग्रजी शब्दाला पर्यायी मराठीतील शब्द म्हणून वापरण्यात आलेला आहे. Instruction म्हणजे सूचना आणि Instructional या शब्दाचा अर्थ शैक्षणिक असा केला जातो. परंतू या ठिकाणी तो अध्यापन या अर्थाने वापरण्यात आलेला आहे हा शब्द वापरण्यामागील भूमिका त्याच्या व्याख्यांवरून अधिक स्पष्ट होतो.

व्याख्या:—"For best result care should not be taken not only that student read to learn but also that text been written to teach'' Rothkopf E.Z.

''अध्ययनाला चालना देण्याऱ्या क्लूप्त्या असलेल्या व अध्यापनाच्या विशिष्ट हेतूने लिखाण केलेले साहित्य म्हणजे स्वयं—अध्यापन साहित्य होय'' —देशपांडे पी.एम. (१९८९)

"An instructional text is a text that has been written with the specific purpose of teaching, containing devices that would facilitate learning. It is these devices that make it a text written to teach''

स्वयं—अध्यापन साहित्य विकसनासाठी पायऱ्या:—

१. गरज विश्लेषणावरून कार्य विश्लेषण
२. उद्दिष्टये आणि स्पष्टीकरणाचे सुसूत्रीकरण
३. संशोधन आणि माहितीचे संकलन
४. नियोजन
५. आदिबंधाचा विकास
६. चाचणी आणि पुनरावलोकन
७. अंतिम साधन विकास
८. साधनाची स्थापना आणि क्षेत्रीय चाचणी
९. अंतिम साधनासाठी पुनरावलोकन
१०. विस्तृत स्वरूपात प्रसारण

१. **गरज विश्लेषणावरून कार्य विश्लेषण:**—व्यक्तीला शिक्षणकृम पूर्ण केल्यानंतर कराव्या लागणाऱ्या कृती ठरविण्यासाठी त्या—त्या क्षेत्रातील संबंधित व्यक्तिंच्या मुलाखती घेऊन आणि त्यांचे निरीक्षण केले जाते.

२. **उद्दिष्टये आणि स्पष्टीकरणाचे सुसूत्रीकरण:**—विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील गरजा आणि समस्यांवरील उपाय निश्चित करण्यासाठी त्या समस्यांचे काळजीपूर्वक विश्लेषण करावे लागते. या विश्लेषणातून मापन योग्य अशी उद्दिष्टये आणि स्पष्टीकरणे निश्चित करावी लागतात.

३. **संशोधन आणि माहितीचे संकलन:**—शिक्षणकृम विकसित करीत असताना काही संशोधनात्मक प्रश्न, समस्या यांच्याशी निगडीत विचारांचा आधार घ्यावा लागतो

उदा:— शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रमाचा विकास करत असताना अत्यंत महत्वाच्या अशा तीन प्रश्नांकडे लक्ष दयावे लागेल. प्रथम परिणामकारक अध्यापनासाठी, कोणती कौशल्य आवश्यक आहेत. निवडलेल्या कौशल्यांमध्ये आपण कितपत परिणामंकारक रितीने प्रशिक्षण देऊ शकतो.

४. **नियोजन:**—

- विद्यार्थ्यांच्या वैशिष्टांची निश्चिती यामध्ये क्षमता, वाचन, कौशल्य, पूर्वज्ञान, प्रेरणापातळी इ. विचार होतो.
- अध्यापनाची पध्दती आणि माध्यम निवडणे.
- पर्यायी पध्दतीची निश्चिती करणे.

५. **आदिबंधाचा विकास:**—आराखडा निर्मितीचा एक टप्पा आहे. मूळ आदिबंध तयार करताना उद्दिष्टये, पध्दती, उपलब्ध सामग्री यांचा विचार करावा लागतो. यासाठी उपलब्ध साहित्याचे मोठया प्रमाणात पुनरावलोकन व तपासणी करावी लागते.

६. **चाचणी आणि पुनरावलोकन:**—आदिबंधाचा विकास झाल्यानंतर चाचणी संच तयार होईल चाचणी संच प्रातिनिधीक गटावर राबविला जातो. अपेक्षित परिणाम दिसून येतो का? कशाचा दिसून येत नाही व असे का घडले? या दृष्टीने मिळालेल्या सामग्रीचे मूल्यमापन केले जाते.

७. **अंतिम साधन विकास:**—अंतिम साधन विकास म्हणजे दैनदिन वापरासाठी योग्य साहित्याचा विकास होय संशोधकाला चाचणीतून मिळालेल्या माहित्याच्या आधारे हे निर्णय घेता येतात. स्वीकारार्ह अपेक्षित पातळी विद्यार्थीने साध्य करावी यासाठी तयार केलेले साहित्य उपयोगी पडले किंवा नाही. हे निश्चित करण्यासाठी क्रमाक्रमाने एकापेक्षा अधिक चाचण्या, पुनरावलोकन व बदलाची गरज वाटल्यास तेही करावे लागतात. शेवटी परिपूर्ण स्वयं—अध्यापन साहित्य तयार होते.

८. **साधनाची स्थापना आणि क्षेत्रीय चाचणी:**—स्वयं—अध्यापनासाठी विकसित केलेल्या साहित्याचा प्रत्यक्ष वापर करणे होय या पायरीचा प्रधान हेतू म्हणजे विकसित केलेल्या साहित्याची व्यापक स्वरूपात अंमलबजावणी करणाऱ्या पध्दती निश्चित करणे हा आहे.

९ **अंतिम साधनासाठी पुनरावलोकन:**—पायरी आठमध्ये विकसित केलेले स्वयं—अध्यापन साहित्य प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात राबविताना येणाऱ्या अडचणी व समस्या यांची माहिती मिळते या माहितीच्या आधारे पुन्हा एकदा गरज वाटल्यास साहित्यात आवश्यक ते बदल करावे लागतात.

१० **विस्तृत स्वरूपात प्रसारण:**—हा स्वयं—अध्यापन साहित्य विकासाचा अंतिम टप्पा आहे. यामध्ये व्यापारी तत्वावर स्वयं—अध्यापन साहित्याच्या प्रसारणावर भर असतो.

स्वंय—अध्यापन साहित्याची मांडणी:—स्वयं—अध्यापन साहित्याची मांडणी करताना पुढील पाच घटकांचा विचार केला जातो.

१. आकृतिबंध
२. भाषा
३. आशय
४. बाहय वैशिष्टये
५. अध्यापनाची परिणामकारकता

१. **आकृतिबंध:**—साहित्य लेखनासाठी विशिष्ट आकृतिबंध वापरण्यात येतो. सुरूवात समग्र प्रेरणादायी आणि जिज्ञासावर्धक प्रास्ताविकाने होते. आशयाच्या सादरीकणानंतर म्हणजे विषय विवेचनानंतर विदयार्थीना स्वयं—मूल्यमापन करण्यासाठी स्वयं—अध्ययन प्रश्न, उपयोजनात्मक प्रश्न आणि कार्य सूचविलेले असते.

२. **भाषा:**—घटकाची उद्दिष्टये लक्ष्यगट अध्ययनकर्ता आणि आशयानुसार योग्य भाषिक घटकांची निवड केली जाते. भाषाशैली संवादरूपी आणि जवळीक निर्माण करणारी असते.

३. **आशय:**—घटकाच्या उद्दिष्टांना अनुसरून आशय असतो. आशय वस्तूस्थितीशी सांगड घालणारा आणि नावीन्यपूर्ण असतो. आशयाचे संघटन आकलनास चालना देणारे आणि तार्किक विचारांना प्रेरणा देणारे असते.

४. **बाहय वैशिष्टये:**—अध्ययन साहित्याच्या सुवाच्यतेसाठी आणि वाचनीयता वाढविण्यासाठी आशयाची योग्य मांडणी केलेली असते आडवे उभे अंतर, मंथळे, अनुक्रम अधोरेखित शब्द, महत्वाचे मुद्दे ठळक व त्यांना चौकट केलेली असते.

५. **अध्यापनाची परिणामकारकता:**—साहित्याचे अध्ययन केल्यानंतर अध्ययनकर्त्यांकडून काय अपेक्षित आहे हे कृतियुक्त उद्दिष्टांद्वारे स्पष्ट केलेले असते. प्रत्येक घटकाच्या अध्ययनासाठी कालावधी निश्चित केलेला असतो. नवीन संकल्पनांचे पुरेसे स्पष्टीकरण, उदाहरणे आणि विद्यार्थ्यांच्या पूर्वानुभवाशी नवीन ज्ञानाची सांगड घातल्यामुळे अध्ययनकर्त्यामध्ये अभिरूची निर्माण होते. अंतिमत: त्यातून अपेक्षित उद्दिष्टये साध्य केली जातात.

- **स्वयं—अध्यापन साहित्याचे वेगळेपण:—**

स्वयं—अध्यापन साहित्यात पारंपारिक साहित्यापेक्षा अनेक घटकांमध्ये वेगळेपणा दिसून येतो.

१. विद्यार्थ्यांमध्ये स्वयं—अध्ययनाची आवड निर्माण केली जाते.
२. साहित्य विद्यार्थ्यांच्या वापरासाठी लिहिले जाते.
३. अभ्यासासाठी किती वेळ लागेल हे सांगितले जाते.
४. विद्यार्थ्यांच्या विशिष्ट वयोगट डोळयासमोर ठेवून विकसित केले जाते.
५. प्रत्येक घटकात हेतू आणि उद्दिष्टये दिलेली असतात.
६. अभ्यासासाठी अनेक मार्ग असतात.
७. विद्यार्थ्यांच्या वायनुसार, आकलन क्षमतेनुसार साहित्याची रचना केलेली असते.
८. स्वयं—मूल्यमापनावर जास्त भर दिलेला असतो.
९. भावनांवर अडचणीवर मात करण्यासाठी प्रवृत्त केले जाते.
१०. घटकाच्या शेवटी, सारांश दिलेला असतो.
११. मोजकाच आशय दिलेला असतो.
१२. अभ्यास कौशल्यांसाठी मार्गदर्शन केले जाते.
१३. विद्यार्थ्यांकडून कृतियुक्त प्रतिसाद अपेक्षित असतो.
१४. यशस्वी अध्ययन व्हावे हा हेतू असतो.

- **स्वयं— अध्यापन साहित्याचे फायदे व मर्यादा:—**

स्वयं—अध्यापन साहित्याचे फायदे

१. विद्यार्थी त्याच्या गतीनुसार स्वयं—अध्ययन करू शकतो.
२. हे स्थिर अध्ययन साहित्य आहे कारण यातून सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक वेळेला सारखेच अनुदेशन दिले जाते.
३. पथदर्शक अभ्यासातून मिळालेल्या निष्कर्षानुसार त्याचे संपादन आणि पुनर्लखन केले जाते स्वयं—अध्यापन साहित्यात बदल आणि संपादनाची प्रक्रिया कायमस्वरूपी चालू राहते.

स्वयं—अध्यापन साहित्याचा मर्यादा:—

१. बोधात्मक विकासासाठी लिखीत साहित्य उपयुक्त ठरते. कौशल्ये आणि भावात्मक परिणाम विकसित करण्यासाठी मात्र हे साहित्य उपयुक्त ठरत नाही.
२. स्वयं—अध्यापन साहित्यात वापरलेली भाषा विद्यार्थ्यांची पूर्वतयारी यांचा काळजीपूर्वक विचार केला जातोच असे नाही.

संदर्भ सूची

१. डॉ. संजीवनी महाले (२००८), अध्यापन प्रतिमाने आणि अध्ययन शैली, इनसाईट प्रकाशन, नाशिक
२. डॉ. किशोर चव्हाण (२०१०), अध्ययन आणि विकासाचे मानसशास्त्र इनसाईट प्रकाशन, नाशिक.
३. डॉ. संजीवनी महाले (२००९), अध्ययन प्रतिमाने, इनसाईट प्रकाशन, नाशिक.
४. डॉ. अरविंद दुनारवे (२००३), प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान व माहिती तंत्रविज्ञान, नुतन प्रकाशन, पुणे.
५. डॉ. अरविंद दुनारवे (२००४), सामजिक शास्त्राचे अध्यापन, नुतन प्रकाशन, पुणे.
६. प्रा.ना. के उपासनी (२००६), अध्यापन साधना, श्री. विदया प्रकाशन, पुणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com